VOL- X ISSUE- V MAY 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# मुस्लिम मराठी साहित्यातील सामाजिक ऐक्याची जाणीव

**प्रा. मोहन बाबुराव चव्हाण**
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील,
महिला महाविद्यालय, सोलापूर
email-chavanmohanb@gmail.com

**हे विश्वची माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर, किंबहुना चराचर । आपणची जाहला ।**

संतराज ज्ञानेश्वरांनी आपल्या “ज्ञानेश्वरी” या ग्रंथामध्ये हे संपूर्ण विश्वच माझे घर आहे ही संकल्पना मांडली आहे. संपूर्ण विश्वाला कवेत घेणाऱ्या या संकल्पनेत, संपूर्ण विश्व हे माझ्या घरासारखे आहे आणि विश्वातील सर्व जीवमात्र हे माझे बांधव आहेत, ही भावना व्यक्त झालेली आहे. हीच भारताची प्राचीन काळापासून परंपरा आहे.

प्राचीन काळामध्ये, एका समूहातल्या लोकांनी एकत्र यावे, शिस्तीने, आणि संघटितपणे जगावे, यासाठी धर्मसंस्था निर्माण केली गेली. परंतु धर्म हा माणसासाठी आहे, धर्मासाठी माणूस नाही, ही गोष्ट लोक विसरून गेले. माणसाची जात आणि धर्म जन्मावरून ठरु लागली. त्याचप्रमाणे वंश, जात व लिंग यावरूनही माणसा-माणसामध्ये भेदभाव केला जातो. वास्तविकपणे, विषमता व भेदभाव ही माणसांनी सत्ता व वर्चस्वाच्या हव्यासापायी निर्माण केलेली व्यवस्था आहे. यामुळेच समाजामध्ये कलह निर्माण होतात.

आज जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून जग हे एक खेडे बनले आहे. नवे तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे. माहिती तंत्रज्ञानाची क्रांती झाली अहि. आता समाजाला खरी गरज आहे, ती अधिकाधिक सुशिक्षित आणि सुसंस्कृत होण्याची. सर्वसामान्य लोकांना चांगल्या प्रतीचे राहणीमान मिळावे, सर्व सुख-सुविधा मिळाव्यात, याची समाजामध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही मूल्ये रुजावीत. विश्वबंधुत्वाची भावना मना-मनांत रुजावी. संत ज्ञानेश्वरांचे “भूता परस्परे जडो । मैत्र जीवाचे” हे स्वप्न साकार व्हावे.

प्रत्येक धर्म मूलत: मानवतेचा व एकात्मतेचाच पुरस्कार करतो. इस्लाम धर्मही याला अपवाद नाही. या धर्मामध्ये स्त्री-पुरुष, काळा-गोरा, गरीब-श्रीमंत अशा कोणत्याही प्रकारच्या भेदभावास थारा

नाही. इस्लाम याचा अर्थच 'शांती' असा आहे. दुसऱ्या धर्माच्या लोकांवर सक्ती किंवा अन्याय करणे इस्लामला मान्य नाही. इस्लामने मानवतेचा पुरस्कार केला आहे. इस्लाम वंश, धर्म, जात, लिंग, आर्थिक परिस्थिती आप्त-परकीय इत्यादी निकषांवर आधारलेला भेदभाव नाकारतो. हीच पार्श्वभूमी मुस्लिम लेखकांच्या लेखनातून व्यक्त झालेली जाणवते.

साहित्य हा समाजाचा आरसा असतो, असे म्हणतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडात जागृत झालेला नवशिक्षित तरुण वर्ग आपापली दु:खे साहित्यातून मांडू लागला. मुस्लिम मराठी लेखकसुद्धा साहित्यातून आपले वास्तव मांडू लागले. आपले मनोगत, आपले अनुभव व विचार यो साहित्यातून मुस्लिम लेखकांनी व्यक्त केले आहेत. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मुस्लिम मराठी कादंबरीतील सामाजिक ऐक्याची जाणीव याविषयी चर्चा केली आहे.

**मुस्लिम मराठी कादंबरीतील सामाजिक ऐक्याची जाणीव-** विविध मुस्लिम मराठी कादंबऱ्यांतून सामाजिक एकात्मता निर्माण आणि बंधुभाव जपण्याची जाणीव व्यक्त झाली आहे.

**इंधन - हमीद दलवाई:** हमीद दलवाई यांच्या "इंधन" या कादंबरीचा नायक माणूसकेंद्री व्यवस्थेचा पुरस्कार करणारा आहे. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा मानव हा श्रेष्ठ आहे, असे मानणारा, आहे. जरी तो धर्माने मुसलमान असला, तरी तो धर्मापेक्षा गावातील सामाजिक एकात्मतेला अधिक महत्त्व देतो. प्रसंगी धार्मिक श्रद्धांना तडा गेला, तरी चालेल, परंतु गावातील शांतता बिघडता उपयोगी नाही, असे त्याचे मत आहे.

नायकाच्या गावामध्ये लक्ष्मी देवीच्या यात्रेच्या वेळी लक्ष्मी देवीच्या पालखीची मिरवणूक हिंदू लोकांनी काढली होती. ही वर्षानुवर्षाची त्या गावातील परंपरा होती. परंतु, या मिरवणुकीच्या वेळी हिंदूंनी मुस्लिमांच्या मशिदीपुढे ढोल वाजवायचा नाही, असा वर्षानुवर्षांचा शिरस्ता होता. पण, या गावातील ब्राह्मण, कुणबी व बौद्ध इत्यादी हिंदू आणि मुस्लिम यांच्यात तणाव निर्माण झाला होता, म्हणून हिंदूंनी या मिरवणूकीच्या वेळी मशिदीपुढे ढोल वाजवून जुना शिरस्ता मोडला ! त्यामुळे गावातील हिंदू- मुस्लिमांमध्ये तणाव निर्माण झाला. या तणावास हिंदू विरुद्ध मुस्लिम असे धार्मिक तंट्याचे स्वरूप प्राप्त झाले. हिंदू विरुद्ध मुसलमान अशी तेढ निर्माण झाली. यावेळी नायकाने स्वत: मुसलमान असून देखील मुस्लिम लोकांना, समजावून सांगितले, की जर हिंदूंना जुना शिरस्ता पाळायचा नसेल, तर जाऊ द्या. धर्मावरून भांडण करून गावातील तेढ त्याला अधिक वाढू

द्यायची नव्हती. त्याचप्रमाणे धर्मापेक्षा माणूस त्याला श्रेष्ठ वाटत होता. याप्रमाणे नायकाने सामाजिक एकात्मता जपण्यासाठी प्रयत्न केला. त्याने सर्व मुस्लिमांना घरी जाण्यास सांगितले, आणि एक मोठे संकट टाळले.

**रहबर - रफीक सूरज:**

रफीक सूरज यांच्या "रहबर" या कादंबरीचा नायक सलीम हा शिक्षक आहे. तळागाळातील मुस्लिम समाजातील सुशिक्षित युवकाचे तो प्रतिनिधित्व करतो. आपल्या समाजातील रुढ असलेले गैरसमज दूर करून या लोकांना वास्तव दृष्टिकोन देण्याची सलीमची तळमळ दिसून येते. अशा प्रकारें तो आपल्या समाजामध्ये बदलाची अपेक्षा करतो.

सलीमच्या गावामध्ये एक मुना दर्गा होता. तो फार जीर्ण होऊन मोडकळीस आला होता. हा दर्गा पुन्हा नव्याने बांधण्याचा विचार इरफानने बोलून दाखवला. सलीमने लगेच यामध्ये पुढाकार घेतला, कारण तो दर्गा गावातील हिंदू- मुस्लिम ऐक्याचे प्रतीक होता. दर्ग्याच्या अशा जीर्णोद्धारामुळे हे हिंदू-मुस्लिम ऐक्य अधिक बळकट होईल, हा सामाजिक एकतेच्या दृढतेसाठी पूरक ठरणारा विचार सलीमने केला.

हिंदू-मुस्लिम ऐक्याविषयीची त्याची तळमळ त्याने मुस्लिम साहित्य संमेलनातील परिसंवादातील भाषणात मांडली. हिंदू, मुस्लिम समाज अगदी एकजीव होऊन जगतात. एकमेकांच्या सुख-दु:खात सामील होतात, परंतु हिंदू-मुस्लिमांच्या एकतेला तडे जाऊ लागल्याची खंत सलीमने व्यक्त केली. त्याने आपल्या भाषणातून असे आवाहन केले की, हा मुद्दा साहित्यात यायला हवा. समाजाला निरोगी जीवन जगण्यासाठीचे दिग्दर्शन साहित्यातून व्हायला हवे.

सलीमच्या या विचारांतून सकस समाज-निर्मितीसाठी सामाजिक ऐक्य आवश्यक असल्याची वास्तव जाणीव व्यक्त झाली आहे.

सलीम एकदा रत्नागिरी येथे "इज्तेमा"ला (मुस्लिम लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी घेण्यात येणारे संमेलन) गेला होता. येथे तीन दिवस चाललेल्या इज्ज्तेमामध्ये प्रवचन, कुराणाचे पठण, सामुहिक विवाह अशा कार्यक्रमानंतर जी प्रार्थना सर्वांनी मिळून केली, त्या प्रार्थनेत अखिल मानवजातीचे कल्याण व्हावे, असा अल्लाह कडे आशीर्वाद मागण्यात आला. या इज्तेमामध्ये लाखो भाविकांनी विश्वबंधुत्वाची प्रार्थना केली.

**जुबा - शकील शेख:**

प्रा. शकील शेख यांची "जुबा" ही कादंबरी हैद्राबाद संस्थान मुक्ती आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. या कादंबरीमध्ये हैद्राबाद राज्यातील

अफजलपूर तालुक्यातील कुलाली या गावातील हिंदू-मुस्लिम संघर्ष चित्रित झाला आहे. हैद्राबाद संस्थान स्वतंत्र, व सार्वभौम रहावे म्हणून निर्माण केलेल्या मुसलमानांच्या रझाकार सेनेचा हिंदू चिरलोक विरोध करत होते. या सझाकार सेनेच्या चळवळीने हैद्राबादमध्ये जोर धरला, तेव्हा तेथील हिंदूवर अत्याचार होऊ लागले. हे सर्व ऐकून कुलाली गावातील मलकप्पा पाटील यांचा मुलगा सिद्धाराम याने गावातील मुस्लिमांवर सूड उगवायचे ठरवले. त्याने गावातील मुस्लिमेतरांची चावडीसमोर सभा बोलावली. या सभेमध्ये त्याने हिंदूंना मुस्लिमांवर सूड उगवण्याचे आवाहन केले. यावेळी गावातील शिक्षक असलेल्या गुरुलिंगप्पा यांनी या आवाहनास विरोध केला. हैद्राबाद संस्थान भारतामध्ये विलिन होणे आवश्यक असले, तरी यासाठी आपल्या गावातील त्रास देणे योग्य नाही, हे त्यांनी निरपराध मुस्लिम लोकांना समजावून सांगितले. जाती-धर्मापेक्षा माणूस महत्वाचा आहे, हे त्यांनी पटवून सांगितले. शेवटी गावातील हिंदूंना आपल्या गावातील मुस्लिमांच्या पाठीशी उभे राहण्याचे त्यांनी आवाहन केले. अशा प्रकारे गुरुलिंगप्पा यांनी मानवता जपली. समाजातील एकोपा कायम रहावा यासाठी प्रयत्न केला.

रझाकार चळवळीविषयी कल्लाप्पा पारील यांच्याशी बोलताना गुरुलिंगप्पा म्हणतात, “हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झालं तर कुणाचंच वर्चस्व राहणार नाही. काय हिंदू, काय मुस्लिम या सर्वांना समान अधिकार मिळेल. कोणी कोणावर अन्याय करू शकणार नाही. निरपराध, मग तो हिंदू असो किंवा मुस्लिम असो, त्याचा बळी जाता कामा नये. सर्वांना त्यांच्या मर्जीप्रमाणे जगण्याचा अधिकार प्राप्त झाला पाहिजे.” तसेच, ते म्हणाले, की 'शेवटी माणूसकी महत्त्वाची आहे. माणसातून माणूसकी वजा केली तर शेवटी काय शिल्लक राहतं सांगा बरं ? हिंदू काय, मुस्लिम काय, शेवटी या मातीतले म्हणून ते आपलेच !'

अशा या पुरोगामी विचार आणि वर्तणूकीतून गुरुलिंगप्पा यांनी सामाजिक एकात्मतेचा पुरस्कार केलेला दिसतो.

कुलाली गावामध्ये राजेबाघसवार या पीराचा ऊरुस मोठ्या प्रमाणावर होत होता. राजेबाघ संवार हा मुस्लिमांचे पीर-व-मुर्शद आहे, म्हणून या ऊरुसाला विरोध करायचे सिद्धारामने ठरवले. त्याप्रमाणे त्याने विरोध केला, परंतु गावातील लोकांनी मात्र ऊरुस व्हावा, असेच मत मांडले. या ऊरुसाला गावातल्या ब्राह्मणापासून दलितापर्यंतचे सगळे लोक येतात. यावेळीसुद्धा सर्वांनी मिळून उरुस साजरा केला. यावेळी

गावातील लोकांनी एकात्मतेचे दर्शन घडवून आणले.

सिद्धारामने मुस्लिमांचा विरोध करण्यासाठी गावातील खुतबू याचा मुलगा रमजान याचा खून केला. यावेळी गुरुलिंगप्पा यांनी गावातील सर्वांना चावडीवर बोलावले. सर्व लोकांना त्यांनी समजावून सांगितले, की हैद्राबादमधील दंगल ही स्वार्थापायी, सत्तेसाठी घडवून आणली जात आहे. याचा धर्माशी काही संबंध नाही. कुलाली गावातील हिंदू-मुस्लिमांच्यात एकता आहे. या एकतेचं प्रतीक म्हणजे ग्रामदेवत राजेबाघ सवार होय. त्यांच्यासमोर हिंदू-मुस्लिम सर्वच नतमस्तक होतात. हाच सामाजिक सलोखा कायम रहावा असे गुरुलिंगप्पा यांनी आवाहन केले. अशा प्रकारे गुरुलिंगप्पा यांनी विवेकपूर्ण विचार करून गावातील लोकांना एकात्मतेचा मार्ग दाखवला.

“लाट”- हमीद दलवाई-

हमीद दलवाई यांच्या “लाट” या कथासंग्रहातील “तकपट” या कथेमध्ये सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडत. एके रात्री मुसलमान वस्तीत एकदम जाळ पसरलेला दिसला, आणि सारा गाव आगीच्या दिशेने लोटला. अहमद खोताच्या पेंढ्यांच्या गंजीस आग लागली होती. लोकांनी धावपळ करून आग विझवली. पण लोकांना वाटू लागले, की आग लागलीच कशी? कशी ? दुसऱ्या दिवशी सकाळी लोक गावचे सरपंच कासमखान यांच्याकडे गेले. महिन्यापूर्वी महाडला दंगल झाली होती, आणि त्याचा परिणाम म्हणून गावातल्या कोणत्याही घरावर रात्री-अपरात्री दगड पडू लागले होते. या पार्श्वभूमीचा फायदा घेऊन कोणीतरी गावात गुंडगिरी करण्याच्या हेतूने ही आग लावली असावी असे गावातल्या लोकांना वाटू लागले. ही आग कोणी लावली याचा छडा लावण्यासाठी लोक कासमखान यांच्याकडे गेले. येथे झालेल्या चर्चेत हैदरने गावातील अण्णा बामणावर संशय व्यक्त केला. कारण अण्णा बामण गावातील एकत्मतेविरोधात नेहमीच काही तरी करत होता. याशिवाय, आवास गावात जी शाळा होती, ती मुस्लिमांनी खर्च करून बांधली होती. पण या शाळेत सर्वच मुले शिकत होती. हिंदू मुलांनी मुसलमानांच्या शाळेत जाऊ नये असे अण्णा बामणाचे मत होते. यामुळे या कारस्थानामागे अण्णाचाच हात असावा, असे सगळ्यांना वाटत होते.

यावेळी कासमखान यांनी त्या रात्री गावातील सगळ्या लोकांची बैठक घ्यायची असे ठरविले. याप्रमाणे बैठक जमली. येथे गावातील, महार, कुळवाडी, ब्राह्मण व मुसलमान या सर्वांनीच ग्रामदेवी लक्ष्मीची शपथ घ्यायची की, “आपण ही आग नाही लावली”. या बैठकीला अण्णा

ब्राह्मण आलाच नाही. कासमखान यांनी अण्णाला निरोप देऊन बोलावून घेतले. बैठकीत सरळ त्याच्यावर आरोप ठेवला. त्यांनाही शपथ घ्यायला भाग पाडले. अण्णाने, कासमखानच्या पुढ्यातील नारळ उचलून शपथ घेतली, “मी लक्ष्मीबायची शपथ घेऊन सांगतो की, अहमद खोताच्या उडवीला मी आगू लावली नाही, जर मी आग लावली असेन आणि खोटी शपथ घेत असेन, तर वर्ष-सहा महिन्यांच्या आत माझं पुरतं तळपट होऊन जाईल!” आणि तो निघून गेला!

पुष्कळ दिवसांनंतर गाव शांत झाला. महाडचेही वातावरण निवळले! आणि एक दिवस अण्णा, खोकून-खोकून मरण पावला । अहमद शफीने ही बातमी कासमखान यांना सांगितली. तेव्हा ते म्हणाले, महालक्सुमीची शप्पत घेतलात ना खोटी ? तलपट व्हायला वेळ लागलो काय ?

या कथेत हिंदू-मुस्लिम एकात्मतेचे दर्शन घडते. गावातील महार, कुळवाडी, बाह्मण आणि मुस्लिम सर्वच लोक मिळून-मिसळून राहतात. एकमेकांच्या विचाराने राहतात. अहमद खोताच्या उडवीला आग न लावल्याची शपथ महालक्ष्मीचा नारळ उचलून घेतली जाते आणि गावातील हिंदू-मुस्लिम त्यावर विश्वास ठेवतात. कासमखान आणि गावातील सर्वांनाच असे वाटते की, महालक्ष्मीची खोटी शपथ घेतल्यामुळेच अण्णांचे तळपट झाले !

या गावातील लोकं जातीभेद, धर्मभेद न करता एक दिलाने राहतात. यात कोणी बाधा आणली तर ते सर्व एकत्र येऊन याचा विरोध करतात. येथे निखळ सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडते.

विविध कादंबरी आणि कथा वाङमयातून मुस्लिम मराठी लेखकांनी सामाजिक ऐक्याची जाणीव व्यक्त केली आहे. आणि मानवतेचा गौरव केला आहे.

**संदर्भ सूची:**

1. हमीद दलवाई, इंधन, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ.1965.
2. मुहम्मद अब्दुररहीम दळवी, (संकलक), धर्म इस्लाम, श्री. जे. प्रिंटर्स, पुणे, प्र.आ.1998.
3. शकील शेख, जुबा, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, प्र. आ. 2014.
4. रफीक सूरज, रहबर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र. आ. 2006.
5. हमीद दलवाई, “लाट”, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. 1961.
6. ताहेर एच. पठाण, अर्चन सोनावणे (संपादक), मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान, संकल्प प्रकाशन, लातूर.